# डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर

---

## “<u>राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे शहीद जवानांना श्रद्धांजली</u>”

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे जम्मू काश्मीर येथील पुलवामा येथे झालेल्या आतंकी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली देण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे व  सह कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. पी. फरकाडे, प्रा. रोहिणी मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली रा. से. यो. च्या 230 विद्यार्थांनी हातात मेणबत्ती घेऊन रॅली काढली रॅलीमधून विद्यार्थांनी पाकिस्तान मुर्दाबाद ‘नही सहेंगे नही सहेंगे आतंकवाद नही सहेंगे अशा प्रकारचे नारे लावून आतंकवाद विरुद्ध आपला रोष व्यक्त केला.

रॅलीचे समापण महाविद्यालयात करण्यात आले. आतंकवादावर स्मारक समितीचे सदस्य श्री. विलास गजघाटे, उपप्राचार्य डॉ. ए. पी. जोशी, डॉ. किशोर रेवतकर, डॉ. हेमा मेनन, डॉ. शैलेश बहादुरे डॉ. रवींद्र तिरपुडे, यांनी आपले विचार व्यक्त करून सर्वांना दोन मिनिटे स्तब्ध राहून शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्रशासकीय अधिकारी डॉ. अरुण जोसेफ व फार मोठ्या संख्येने विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते. ये मेरे वतन के लोगो जरा आख मे भरलो पाणी जो शहीद हुये है उनकी जरा याद करो कुर्बानी हे देशभक्ती गीत म्हणून दुख:द अंत:करनाणे शहीद जवानांना श्रद्धांजली दिली.